NASHIK METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY
NASHIKMETROPOLIS

# नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
## Nashik Metropolitan Region Development Authority, Nashik

सर्व्हे नं.६४८/ब २, फा. प्लॉट नं. ३११ पै., जैन मंदिराजवळ, राका कॉलनी,
नाशिक – ४२२ ००२ (दूरध्वनी : ०२५३-२९५९७८७) email : nmrda.nsk@gmail.com

पुण्यश्लोक ३००

## कार्यालयीन आदेश

**विषय :** नाशिक महानगर क्षेत्रात ५० पेक्षा जास्त सदनिका असलेल्या गृहनिर्माण / अपार्टमेंट योजनांमध्ये ग्रे-वॉटर रिसायकलिंग प्लाँटच्या तरतुदींबाबत .. ..

एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR), २०२० नुसार (दि. ३०.०१.२०२५ पर्यंत अद्ययावत केल्यानुसार) नियमन क्र. १३.४ अंतर्गत काही मोठ्या प्रकल्पांसाठी (विशिष्ट इमारती ज्यामध्ये १०० पेक्षा जास्त सदनिका असलेल्या गृहनिर्माण प्रकल्पांचा समावेश आहे) सदरच्या प्रकल्पांमध्ये ग्रे-वॉटर रिसायकलिंग आणि पुनर्वापराची सुविधा अनिवार्य आहे.

नाशिक महानगर क्षेत्रात सध्या शहरी विकासाचा वेग प्रचंड वाढला आहे. विशेषत: गृहनिर्माण प्रकल्पांच्या बांधकामांमध्ये ही वाढ, जरी प्रादेशिकदृष्ट्या फायदेशीर असली तरी, वाढत्या सांडपाण्याच्या प्रमाणाचे व्यवस्थापन करताना मोठे आव्हान उभे राहिले आहे. स्नानगृहे, सिंक आणि वॉश एरियामधून बाहेर पडणा-या ग्रे-वॉटरचा (सांडपाणी) अयोग्य विसर्ग विद्यमान सांडपाणी प्रक्रिया पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण निर्माण करतो आणि शाश्वत शहरी विकासाला चालना देण्यासाठी, नवीन आणि आगामी प्रकल्पांमध्ये जल व्यवस्थापनाची सक्रिय धोरणे स्विकारणे महत्वाचे आहे.

एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० अंतर्गत सध्या १०० पेक्षा जास्त सदनिका असलेल्या गृहनिर्माण योजनांसाठी अनिवार्य असलेल्या तरतुदी विचारात घेता, नाशिक महानगर क्षेत्रात ५० पेक्षा जास्त सदनिका असलेल्या सर्व गृहनिर्माण संस्था व अपार्टमेंट प्रकल्पांना स्वेच्छेने ग्रे-वॉटर रिसायकलिंग प्लाँटस् चा अवलंब करण्यास आणि उपचारित पाण्यासाठी दुहेरी प्लंबिंगच्या प्रणालीसह या प्लाँटस् चा वापर करुन शाश्वत विकासाच्या तत्वांशी सुसंगतरित्या अवलंब करणे भविष्याच्या दृष्टीने योग्य ठरेल.

नाशिक महानगर क्षेत्रातील शाश्वत जल व्यवस्थापन आणि पर्यावरणाच्या संरक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी व्यापक जनहितार्थ प्रसिध्द करण्यात येत आहे. सर्व विकासक, वास्तुविशारद आणि भागधारकांना विनंती आहे की, त्यांनी पुर्ण सहकार्य करावे आणि ५० पेक्षा जास्त सदनिका असलेल्या सर्व गृहनिर्माण योजनांमध्ये स्वच्छेने ग्रे-वॉटर रिसायकलिंग उपायांचा अवलंब करावा, जेणेकरुन या क्षेत्राच्या हरित आणि शाश्वत भविष्यासाठी योगदान करता येईल.

जा.क्र.नावि/आस्था/कार्या.आदेश/८९
नाशिक
दिनांक : 03/06/2025

Nashik Metropolitan Region Development Authority ★ Nashik

(डॉ माणिक गुरसळ, भा प्र से)
महानगर आयुक्त,
नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक

**प्रत माहितीस्तव :**

१. सर्व अधिकारी, नगर रचना विभाग
२. सर्व कर्मचारी, तांत्रिक शाखा
३. आदेश फाईल
४. आर्किटेक्ट असोसिएशन, नाशिक
५. आर्किटेक्ट व इंजिनिअर्स असोसिएशन, नाशिक
६. असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हील इंजिनिअर्स, नाशिक